**प्रेसनोट दिनांक २४/०६/२०१९**

**पोलीस स्टेशन- येरवडा पोलीस स्टेशन, पुणे**

**कम्युनिटी पोलीसींग, पोलीस काका व सहकार्यातून सुरक्षेकडे (सीसीटीव्ही कॅमेरे) संकल्पने अंतर्गत गेनबा मोझे प्रशाला व कर्नल यंग म.न.पा. शाळा, ४५/ब, पर्णकुटी, पुणे येथे भेट देवून तेथील शिक्षक व विद्यार्थ्यांची बैठक घेवून त्यांना मागदर्शन केले बाबत.**

---

कम्युनिटी पोलीसींग, पोलीस काका व सहकार्यातून सुरक्षेकडे (सीसीटीव्ही कॅमेरे प्रकल्प) या संकल्पनां अंतर्गत श्री.अजय वाघमारे, पोलीस निरी.(गुन्हे) अति.कार्यभार वरिष्ठ पोलीस निरीक्षक, येरवडा पो.स्टे. यांचे मार्गदर्शनाखाली येरवडा पो.स्टे.कडील पो.उप.निरी. श्री. व्ही.जे.माने यांनी दि.१७/०६/२०१९ रोजी सकाळी ११:०० वा. ते १२:३० वा.चे दरम्यान येरवडा पो.स्टे.चे हद्दीतील (१) गेनबा मोझे प्रशाला, लक्ष्मीनगर (२) कर्नल यंग म.न.पा. शाळा, ४५/ब, पर्णकुटी चौक, पुणे येथे भेट देऊन तेथील शिक्षकांची तसेच विद्यार्थ्यांची बैठक घेवून त्यांना पोलीस काका या संकल्पनेची माहिती दिली. तसेच बालकांचे संदर्भातील कायदे व बालकांसंदर्भातील घडणारे गुन्हे, बालगुन्हेगारी इत्यादी विषयांबाबत माहिती देऊन सदर गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी करावयाच्या उपाययोजना खबरदारी याबाबत माहिती देऊन मार्गदर्शन केले.

तसेच सहकार्यातून सुरक्षेकडे (सीसीटीव्ही कॅमेरे प्रकल्प) याची माहिती देऊन बालकांचे व महिलांची सुरक्षा या करीता सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे महत्व समजावून सांगून त्यांना त्यांचे शाळेचे अंतर्गत भागात तसेच बाहेरील परिसर रोड कव्हर होईल अशा रितीने सीसीटीव्ही कॅमेरे बसविणेबाबत आवाहन करून लेखी पत्र दिले. तसेच पोलीस आयुक्तालयाकडून नागरिकांसाठी राबविण्यात येणारे विविध १४ योजनांची माहिती देण्यात आली आहे.

अशा प्रकारे श्री.अजय वाघमारे, पोलीस निरी.(गुन्हे) अति.कार्यभार वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांचे मार्गदर्शनाखाली येरवडा पोलीस स्टेशन कडील पो.उप.निरी. श्री. व्ही.जे.माने यांनी कम्युनिटी पोलीसींग, पोलीस काका व सहकार्यातून सुरक्षेकडे (सीसीटीव्ही कॅमेरे प्रकल्प) या संकल्पने अंतर्गत (१) गेनबा मोझे प्रशाला, लक्ष्मीनगर (२) कर्नल यंग म.न.पा. शाळा, ४५/ब, पर्णकुटी चौक, पुणे येथे बैठका घेवून पोलीस काका संकल्पनेची माहिती देवून व सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचे आवाहन करून पोलीस आयुक्तालयाकडून नागरिकांसाठी राबविण्यात येणारे विविध योजनांची माहिती देऊन



**( अजय वाघमारे )**

पोलीस निरी.(गुन्हे),

अति.कार्यभार व.पो.निरी.

येरवडा पोलीस स्टेशन, पुणे

